दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शुक्रवार दि.७ नोव्हेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ७७ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Friday 7 Nov 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 77 | Pages 4 | Rate 4 Rs


## कामठीमध्ये ६५ बुथवर दुबार मतदार

**मुंबई**–चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महाराष्ट्राच्या मतदार यादीवर बोलण्यापूर्वी राहुल गांधी यांनी विचार केला पाहिजे. त्यांनी नुसते झोपेचे सोंग स्वीकारले असेल तर मला माहिती नाही. सर्वात आधी त्यांनी कामठीवर दुबार मतदार असल्याचा आरोप लावला, ते संपूर्ण राज्यात आहे. आशिष शेलार बोलले त्यात काही चूक नाही. कामठीमध्ये ६५ बुथ असे आहेत की जिथे मला २ मते आणि काँग्रेसच्या उमेदवाराला ६०० मते आहेत. त्या बुथवर १०-१० लोकं दुबार मतदार आहेत. इतकं त्या ठिकाणी वाईट परिस्थिती आहे. राहुल गांधीचे वेडेपण आहे, त्यांनी तपास केला पाहिजे.

# मनोज जरांगेंच्या हत्येचा कट; अडीच कोटींची सुपारी

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी लढा देणारे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या जीवाला धोका आहे. मनोज जरांगे यांच्या हत्येचा कट रचण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्याच्या हत्येसाठी अडीच कोटींची सुपारी देण्यात आली आहे. बीडमधील एका बड्या नेत्याचा या कटात हात असल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणी पोलिस ठाण्यात धाव घेण्यात आली असून पोलिस तपास करत आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचला जात असून बीडमधील एका बड्या नेत्याचा यामध्ये हात आहे. मनोज जरांगे पाटलांच्या एका सहकाऱ्यासह अन्य एका व्यक्तीसोबत बीडमध्ये बैठका झाल्या होत्या. मनोज जरांगेंचे सहकारी गंगाधर काळकुटे यांनी यासंदर्भात जालना पोलिस अधीक्षकांना निवेदन दिल्याची माहिती आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दोन व्यक्तींना जालना पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. यासंदर्भात स्वतः मनोज जरांगे पाटील हे देखील जालना पोलिस अधीक्षकांना रात्री उशिरा भेटल्याची माहिती आहे.

मनोज जरांगे यांचे सहकारी गंगाधर काळकुटे यांनाही जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. गंगाधर काळकुटे स्वतः बीड पोलिस अधीक्षकांना भेटून निवेदन देणार आहेत. याप्रकरणी जालना स्थानिक गुन्हे शाखेने बीडमधून दोघांना ताब्यात घेतले असून त्यांची नावे समोर आली आहेत. अमोल खुणे आणि दादा गरुड असं ताब्यात घेतलेल्या व्यक्तीचे नावे आहेत. अमोल खुणे हा मनोज जरांगे पाटील यांचा जुना सहकारी आहे. काही कोटींची ऑफर देऊन हा कट रचल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. स्थानिक गुन्हे शाखेकडून ताब्यात घेतलेल्या दोघांची कसून चौकशी सुरू आहे. ऑफर देणारा बडा नेता परळीचा असल्याचे सांगितले जात आहे.



**"** मराठा आंदोलनासाठी लढा देणारे मनोज जरांगे यांना जीवे मारण्याची धमकी आणि जीवे मारण्याचा कट रचण्याच्या प्रयत्नात असणाऱ्याा दोन जणांना पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे मराठवाड्यात खळबळ उडाली आहे. ज्यांनी कुणी हे केलं त्याने चुकीच्या ठिकाणी हात घातला आहे. असे बाटगे आम्ही लय पाहिले. तू लय चूक केली. कारण मी, करून घेणारा म्हणतोय. हे चुकीचं पाऊल तू उचलायचा नको होतं. तू पुढे ध्यानात ठेव' असं म्हणत मनोज जरांगेंनी या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली.

## डॉ.राधा तांबे यांचा ब्रह्मकुमारी संघटनेच्या ९० व्या वर्धापन दिनानिमित्त गौरव

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

ब्रह्मकुमारी संघटनेच्या स्थापनेला ९० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने बीड जिल्ह्यात विविध क्षेत्रात समाजसेवा करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. ब्रह्मकुमारी संघटना सध्या ११० देशांमध्ये कार्यरत असून तिचे सुमारे दहा लाख अनुयायी आहेत.प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, बीडच्या प्रमुख प्रज्ञा दीदी यांच्या हस्ते योग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय खेळाडू डॉ. राधा तांबे यांचा 'सत्कारमूर्ती' म्हणून गौरव करण्यात आला.



या कार्यक्रमात मिस इंडिया ईशा अग्रवाल, या सुप्रसिद्ध तेलुगू अभिनेत्री, विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तसेच कार्यक्रमाचे मुख्य वक्ते राज्ययोगी प्रो. ई. व्ही. गिरीश यांनी अध्यात्म, योग आणि मानवतेच्या एकात्मतेवर प्रेरणादायी विचार मांडले.डॉ. तांबे गेल्या पाच ते सहा वर्षांपासून योगाच्या माध्यमातून समाजासाठी अविरत कार्य करत आहेत. तसेच त्या राधिका अँडव्हान्स योग सेंटर च्या माध्यमातून ऑनलाईन आणि ऑफलाईन योग प्रशिक्षण वर्ग चालवतात. शिवाय त्या अनेक वर्षांपासून चराटा प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये योग प्रशिक्षक म्हणून रुग्णांची योगाच्या माध्यमातून सेवा करतात व पारंपारिक भारतीय चिकित्सक (आयुष )पद्धतीने त्यांना निरोगी आणि सुदृढ करण्याकडे त्यांचा भर असतो. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेकांच्या आरोग्यात सकारात्मक बदल घडून आला असून, सुदृढ व निरोगी व्यक्तिमत्त्व घडवून सशक्त समाजनिर्मितीत त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

## लिंबोटा गावच्या उपसरपंच पदी प्रकाश राठोड यांची निवड

### जेष्ठ नेते फुलचंदराव कराड यांची घोषणा

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील प्रसिद्ध ग्रामपंचायत असलेल्या लिंबोटा गावच्या उपसरपंचपदी प्रकाश किशन राठोड यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून या निवडीची घोषणा भगवान सेनेचे सरसेनापती तथा जेष्ठ नेते फुलचंदराव कराड यांनी केली.

लिंबोटा गावच्या उपसरपंच पदाची निवड करण्यासंदर्भात बोलावण्यात आलेल्या बैठकीत उपसरपंच पदासाठी रवि कराड यांनी प्रकाश राठोड यांचे नाव सुचविले त्यास मुंडे यांनी अनुमोदन दिले.जेष्ठ नेते फुलचंदराव कराड यांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध निघालेल्या या ग्रामपंचायतीच्या सरपंच दैवशाला बनसोडे,इंद्रमोहन मुंडे,जयराम मुंडे,सिध्दार्थ बनसोडे,रमेश चव्हाण, ग्रामसेवक राठोड यांची उपस्थिती होती.यापुर्वी अरुण मुंडे हे उपसरपंच होते.फुलचंदराव कराड यांच्या नेतृत्वाखाली लिंबोटा गावात शासनाच्या विविध योजनांसह सामान्य नागरीकांसाठी अनेक उपक्रम राबविण्यात येत असतात.यापुढेही कराड साहेबांच्या नेतृत्वाखाली काम करणार असल्याचे नवनिर्वाचित उपसरपंच प्रकाश राठोड यांनी सांगितले.



## वडाळी ते खैरवे भडगाव मार्गावर काटेरी झाडांची सफाई वाहनधारकांना मोठा दिलासा

दैनिक वादळ वार्ता
**लाला चव्हाण | वडाळी**

वडाळी, ता. शहादा वडाळी ते खैरवे भडगाव या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना गेल्या काही काळापासून काटेरी बाभळांच्या झुडपांचे साम्राज्य निर्माण झाले होते. या काटेरी झाडांमुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. वाहन चालवताना रस्त्याच्या कडेला असलेल्या बाभळीच्या फांद्या आणि काट्यांमुळे प्रवास जणू तारेवरची कसरत ठरत होता.

या समस्येची दखल घेत जिल्हा परिषदेच्या माजी बांधकाम व आरोग्य सभापती सौ. हेमलता ताई शितोळे-पाटील आणि उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते श्री. शशिकांतभाई पाटील यांच्या पुढाकारातून या रस्त्यालगत असलेल्या काटेरी झाडे व बाभळीची झुडपे हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे.या



उपक्रमामुळे खैरवे, भडगाव, देऊर तसेच वडाळी परिसरातील वाहनधारक व नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, रस्त्याने वाहतूक आता सुरळीतपणे सुरू झाली आहे. या लोकहिताच्या कार्याबद्दल नागरिकांतून सौ. हेमलता ताई शितोळे-पाटील आणि श्री. शशिकांतभाई पाटील यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

## ठिक ठिकाणी रस्ता खचल्याने पाच महिन्यांपासुन वडफळी बस बंद

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी | मोलगी**

अक्कलकुवा तालुक्यातील पावसाळ्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे ठिक ठिकाणी रस्ता खचल्याने गेल्या पाच महिन्यांपासुन पिंपळखुटा ते वडफळी दरम्यान बस सेवा बंद असल्याने नागरिकांना अतोनात त्रास सहन करावा लागत असुन तातडीने रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी होत आहे.सातपुडयाच्या कुशीत पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडल्याने मोलगी ते वडफळी या रस्त्यावर ठिक ठिकाणी साईड पटटींवरील रस्ता खचला आहे त्यामुळे वळण रस्त्यांवर रस्त्याची रुंदी कमी झाली आहे. साईड पट्ट्यांच्या मोठ्या दुरावस्थामुळे व रस्त्याच्या वळणाच्या खचलेल्या भागामुळे गेल्या पाच महिन्यांपासून एस. टी बस बंद असल्याने वडफळी परिसरातील नागरिकांना व इतर वाहनधारकांना गैरसोयीचे झाले आहे.



पिंपळखुटा ते वडफळी गावा दरम्यान पिंपळखुंटा येथील नदीवर मोठा खड्डा असल्याने एस टी. बसचा मागील भाग हा रस्त्यावर टेकला जात असल्याने हा मोठा खड्डा देखील दुरुस्त करणे गरजेचे झाले आहे पिंपळखुंटा, मोकसच्या पुरापाणीपाडा वळणावर, जांभापाणी वळणावर, पांढरा माती पाटीलपाडा वळणावर रस्त्यांचे भाग खचुन पडले आहे. पिंपळखुंटा ते वडफळी हा रस्ता गेल्या पाच महिन्यांपासून धोकेदायक झाला असुन संबंधित बांधकाम विभागाकडुन त्याची दुरुस्ती करण्यात येत नसल्याने या परिसरातील नागरिकांना व वाहनधारकांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे.पिंपळखुंटा, मोकस, वडफळी रस्त्यावर खड्ड्यांमुळे व वळणाचे भाग खचले असल्याने ते इतर वाहनधारकांना देखील धोकेदायक झाले आहेत. गेल्या चार महिन्यांपासून वडफळी मुक्कामी बस ही पिंपळखुंटा येथून पुढे वडफळी पर्यंत जात नसल्याने मोकस, पांढरा माती, वडफळी, मोवाण, बगदा, चापडी, केवडी, अरेठी, कुकडीपादर या परिसरातील प्रवाशांना, नागरीकांना व शालेय विद्यार्थ्यांना गैरसोयीचे झाले आहे. त्यामुळे तातडीने रस्ता दुरुस्ती करुन वडफळी पर्यंत बस सोडण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

## कामे करताना गट तट कधीच पाहिला नाही यापुढेही पाहणार नाही-बदामराव पंडित



दैनिक वादळ वार्ता
**गेवराई |प्रतिनिधी**

गेल्या ३० वर्षापासून राजकारण आणि समाजकारणात मी कधीही कोणतेही काम करताना गट तट आणि पक्ष पाहिला नाही. आलेला प्रत्येक माणूस मोठ्या अपेक्षेने माझ्याकडे काम घेऊन येतो आणि मीही त्यांची कामे प्रामाणिकपणे करतो. यामुळे सामान्य माणूस आणि माझे एकमेकांशी नाते जुळलेले आहे. ते यापुढेही कायम ठेवण्यासाठी माझ्याकडून प्रयत्न राहतील अशी ग्वाही देऊन येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये एक जीवाने सर्व पदाधिकाऱ्यांनी काम करावे असे आवाहनही भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी व्यक्त केली आहे.

माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केल्यानंतर गेवराई विधानसभा मतदारसंघातील नागरिक आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारल्याचे दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर गोविंदवाडी येथे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचा गावकऱ्यांच्या वतीने गावातून सवाद्य मिरवणूक काढून भव्य सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी सभापती युधाजित पंडित, युवा नेते रोहित पंडित, युवा नेते यशराज पंडित, कैलास माने, प्रकाशराव तळेकर, गोविंद जोशी, श्रीमंतराव यादव, मुकुंद बाबर, शिवाजीराव चव्हाण, भाऊसाहेब माखले, बबलू खराडे, सतीश सपकाळ, राजाभाऊ विटकर, शेख अफसर, बापूसाहेब जाधव, पिंटू गर्जे, संतराम निकम, सुंदर नाना तिवारी, पप्पू चौधरी, किशोर हत्ते, किसनराव भुसे, चंद्रसेन जाधव, माऊली गावंडे, परमेश्वर जाधव, निखिल करडे, अविनाश थोरात, गणेश कानगुडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या सर्वांचे आयोजक राजेश पेजगुडे, बाबा शिंगाडे, महादेव मोरे, कारभारी बिचकुले, दत्ता झणझणे, किशोर वाघमोडे, महादेव शिंगाडे, विठ्ठल पेजगुडे, कृष्णा शेंडगे, सुंदर गायकवाड, साळीग्राम बिचकुले, दामोदर मराठे, तुकाराम नरवडे, बालासाहेब झणझणे, सिद्धेश्वर गायकवाड, मोहन वाघमोडे, भागवत झणझणे आदींनी स्वागत केले. सत्कार सोहळ्यास पंचक्रोशीतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपादकीय

# गंजाची समस्या आणि सरकारी उपाय

देश अभूतपूर्व वेगाने पायाभूत सुविधांमध्ये वाढ अनुभवत आहे. महामार्गांच्या जलद विस्तारापासून विमानतळ, रेल्वेमार्ग आणि स्मार्ट शहरांच्या विकासापर्यंत वाहतूक आणि शहरी प्रणालींचे आधुनिकीकरण करण्यासाठी देशात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. तथापि, कोणत्याही मोठ्या प्रमाणात विकासाला असंख्य आव्हानांना तोंड द्यावे लागते. भारताचा विविध भूभाग पायाभूत सुविधांच्या विकासात एक मोठा अडथळा आहे. उत्तरेकडील खडकाळ आणि डोंगराळ प्रदेशांपासून दक्षिणेकडील पूरप्रवण मैदानांपर्यंत कंत्राटदारांना विविध वातावरणात माती स्थिर करण्याचे सतत आव्हान असते. भूस्खलनाच्या शक्यता असलेल्या भागात, मातीची धूप भिंती कमकुवत करू शकते आणि धोकादायक कोसळण्यास कारणीभूत ठरू शकते. स्टीलसारख्या पारंपरिक बांधकाम साहित्यात, विशेषतः भारताच्या किनारी आणि दमट प्रदेशात गंज ही एक मोठी समस्या आहे. गंज केवळ सामग्रीची ताकद कमी करत नाही, तर दीर्घकालीन देखभाल खर्चदेखील वाढवते. स्टीलऐवजी पॉलिमरिक स्ट्रॅप्स गंजण्यास अत्यंत प्रतिरोधक असतात. त्यामुळे ते किनारी आणि दमट वातावरणात वापरण्यासाठी आदर्श बनतात. हे स्ट्रॅप्स पॉलिथिलीन किंवा पॉलिस्टरसारख्या सामग्रीपासून बनवले जातात, जे मातीमध्ये आढळणाऱ्या ओलावा किंवा रसायनांमुळे प्रभावित होत नाहीत. हे टिकाऊ असतात. पॉलिमरिक स्ट्रॅप्स दीर्घकाळात अधिक किफायतशीर ठरतात.प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पात वेळ आणि बजेट मर्यादा हे एक सामान्य आव्हान आहे. कामगारांची कमतरता, साहित्याची उपलब्धता आणि अनपेक्षित जमिनीच्या परिस्थितीमुळे होणारा विलंब खर्च वाढवू शकतो. भारत अनेक सक्रिय टेक्टोनिक प्लेट्सवर वसलेला आहे. भूकंप आणि जमिनीच्या हालचालींमुळे पूल, संरक्षक भिंती आणि तटबंदीसारख्या पायाभूत सुविधा अस्थिर होऊ शकतात. संरचना योग्यरित्या मजबूत न केल्यास आपत्तीजनक नुकसान होऊ शकते. पॉलिमरिक स्ट्रॅप्समध्ये भूकंपामुळे निर्माण होणारी शक्ती शोषून घेण्याची आणि वितरित करण्याची अद्वितीय क्षमता असते. त्यांची लवचिकता संरचनांना कोणत्याही व्यत्ययाशिवाय जमिनीच्या हालचालीदरम्यान किंचित वाकण्याची परवानगी देते. यामुळे ते भूकंपप्रवण भागात विशेष प्रभावी बनतात. पायाभूत सुविधा प्रकल्पांना त्यांचा पर्यावरणीय प्रभाव कमी करण्यासाठी वाढत्या दबावाचा सामना करावा लागत आहे. काँक्रीट आणि स्टीलसारख्या पारंपरिक साहित्यांमध्ये उच्च कार्बन फूटप्रिंट असते आणि प्रकल्पाच्या जीवनचक्राच्या शेवटी त्यांचा पुनर्वापर करणे कठीण होऊ शकते. पॉलिमरिक स्ट्रॅप्स पारंपरिक साहित्याला अधिक शाश्वत पर्याय देतात. त्यांच्या उत्पादनात स्टीलपेक्षा कमी कार्बन फूटप्रिंट आहे आणि प्रकल्पाच्या जीवनचक्राच्या शेवटी त्यांचा पुनर्वापर करणे सोपे आहे.याव्यतिरिक्त, पॉलिमरिक पट्ट्या अधिक टिकाऊ असल्याने आणि कालांतराने कमी देखभालीची आवश्यकता असल्याने, आपल्याला पर्यावरणपूरक योग्य पर्याय मिळतो. 'नॅशनल इन्फ्रास्ट्रक्चर पाइपलाइन' (एनआयपी) अनेक बाबतीत नियोजन आयोगाच्या पंचवार्षिक योजनेशी साम्य आहे, कारण त्यात देशासाठी पाच वर्षांच्या क्षेत्रनिहाय गुंतवणूक योजनेची रूपरेषादेखील आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०१९ रोजी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात 'एनआयपी'ची घोषणा केली होती. 'एनआयपी' तयार करण्यासाठी आर्थिक व्यवहार सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय टास्क फोर्स स्थापन करण्यात आला होता. २०२१ ते २०२५ या आर्थिक वर्षांसाठी टास्क फोर्सचा अंतिम अहवाल २९ एप्रिल २०२० रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी प्रसिद्ध केला. त्यात पाच वर्षांच्या कालावधीत पायाभूत सुविधांमध्ये १११ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. 'एनआयपी'मध्ये समाविष्ट असलेला प्रत्येक प्रकल्प शंभर कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणुकीचा आहे. यामध्ये नवीन आणि विद्यमान दोन्ही प्रकल्पांमधील गुंतवणूक समाविष्ट आहे. 'एनआयपी'चा आढावा घेतल्यास काही क्षेत्रांमध्ये मूळ योजनेतील काही उल्लेखनीय कामगिरी आणि विचलन दिसून येते.'एनआयपी'मध्ये प्रस्तावित केलेली सुरुवातीची गुंतवणूक आणि डेटा सादर करण्याची आणि अपडेट करण्याची सध्याची पद्धत यांच्यातील सरेखन कठीण आहे. 'एनआयपी'च्या प्रगतीचा मागोवा घेणारे 'इंडिया इन्व्हेस्टमेंट ग्रीड पोर्टल' त्वरित अपडेट होते. त्यात १६८.९३ लाख कोटी गुंतवणूक करण्याचे नियोजन आहे. तथापि, 'उपलब्धी'चे आकडे सुरुवातीला आश्चर्यकारक आहेत. ११ मार्च २०२५ पर्यंत एकूण ३१.१ लाख कोटी रुपये गुंतवले गेले होते, जे सुरुवातीच्या १११ लाख कोटी रुपयांपैकी फक्त २८ टक्के आहे. ६१ टक्के प्रकल्प अजूनही अमलात आणले जात आहेत. त्याची किंमत ८३.७५ लाख कोटी रुपये आहे. पायाभूत सुविधा प्रकल्पांची संकल्पना, डिझाइन आणि अंमलबजावणी चार वर्षांपेक्षा जास्त काळ घेते. त्यामुळे अपूर्ण प्रकल्प प्रत्यक्ष भांडवली गुंतवणूक म्हणून गणले जाणे योग्य आहे. यामुळे एकूण ११५ लाख कोटी रुपये गुंतवणूक होईल. हे मूळ योजनेच्या १०३ टक्के आहे! हा आकडा केंद्र, राज्य, बिगर-अर्थसंकल्पीय संसाधने आणि खासगी क्षेत्रातील पायाभूत सुविधा गुंतवणुकीसाठीच्या २० लाख कोटींच्या वार्षिक अंदाजाशीदेखील जुळतो. एकूण पायाभूत सुविधा गुंतवणुकीपैकी सार्वजनिक क्षेत्राचा वाटा अंदाजे ८० टक्के आहे. म्हणून खासगी क्षेत्रातील गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे अत्यंत महत्त्वाचे होते. हे लक्षात घेऊन, २०२१ च्या सुरुवातीला राष्ट्रीय मुद्रीकरण पाइपलाइन (एनएमपी) लाँच करण्यात आली.'एनआयपी'सोबत त्याचे एकत्रीकरण सर्व विद्यमान सरकारी मालकीच्या पायाभूत सुविधा मालमत्ता खासगी क्षेत्राला अंशतः किंवा पूर्णपणे विकण्याचे उद्दिष्ट ठेवते. हे काम चार वर्षांमध्ये पार पाडायचे असून सहा लाख कोटी उभारण्याचे उद्दिष्ट आहे. २०२४-२५ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, 'एनएमपी'चे निकाल खूपच उत्साहवर्धक आहेत. सरकारने याद्वारे आतापर्यंत तीन लाख ८६ हजार कोटी उभारले आहेत. त्यात रस्ते, वीज, कोळसा आणि खाण क्षेत्रांचा सर्वाधिक वाटा आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये 'एनएमपी'द्वारे आणखी एक लाख ९१ हजार कोटी रुपये उभारण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. नीती आयोग पायाभूत सुविधांच्या मुद्रीकरणासाठी पंचवार्षिक योजना तयार करत आहे. 'एनएमपी'चे नूतनीकरण करण्यासाठी नवी उद्दिष्टे समाविष्ट केली जाण्याची अपेक्षा आहे. अंदमान बेटांमधील गलाथिया खाडीपासून महाराष्ट्रातील वाढवणपर्यंत प्रमुख बंदरांच्या विकासावर काम सुरू आहे. नवीन आणि प्रमुख विमानतळदेखील वेगाने बांधले जात आहेत. शंभर गीगावॅट अणुऊर्जा क्षमता साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवून अणुऊर्जेमध्ये महत्त्वपूर्ण गुंतवणुकीची तयारी सुरू राहील. महामार्ग, सौर आणि पवन ऊर्जाक्षेत्रात महत्त्वपूर्ण गुंतवणूक सुरूच राहील, तर पंप केलेल्या साठवण प्रकल्पांमध्ये आणि ट्रान्समिशन आणि वितरण नेटवर्कमध्ये नवी गुंतवणूक वेगाने येईल. शिवाय, पुढील 'एनआयपी' आरोग्य, शिक्षण, गृहनिर्माण, डिजिटल पायाभूत सुविधा आणि शेती यांसारख्या सामाजिक पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणुकीवर अधिक भर देण्याची शक्यता आहे. असे असले, तरी पुरेशी तरतूद, गतीने भूसंपादन, कामाची गती आणि दर्जा तसेच भ्रष्टाचारावर नियंत्रण ही आव्हाने कायम आहेत. त्यावर मात करण्याचे आव्हान सत्ताधाऱ्यांपुढे आहे.

# मनाचे दिवस, 'मानाचे' दिवस!

'प्राथमिक आरोग्यकेंद्रे आणि जिल्हा रुग्णालयातील मनोविकारकक्षात गेल्या तीन वर्षांत तब्बल बत्तीस लाखांवर रुग्णांनी मदत घेतली', ही विक्रमी संख्या असल्याचे वृत्त वाचनात आले आणि मन चाळीस वर्षे मागे गेले! रुग्णांनी मदत घेतली', ही विक्रमी संख्या असल्याचे वृत्त वाचनात आले आणि मन चाळीस वर्षे मागे गेले!एक जुना प्रसंग, साल १९९०. मी मानसतज्ज्ञाचा व्यवसाय सुरु करून पाच-सहा वर्षे झाली असतील. एक खेडवळ दिसणारा माणूस आपल्या शाळकरी पोराला घेऊन आला.'डॉक्टर, याचं अभ्यासात लक्ष लागत नाहीय. आठवीत आहे, मागल्या वर्षापर्यंत छान अभ्यास करायचा. वर्गात पहिला नंबर असायचा. आजकाल सगळं लक्ष खेळण्यात. ऐकत नाही, उलटी उत्तरे देतो. इंग्रजी कठीण जाते त्याला. बघा जरा डोस्कं तपासून काही फॉल्ट हाय का,' बापाने कैफियत मांडली, आणि मी आश्चर्यमिश्रित कौतुकाने पाहत राहिलो. जिथे मनाचे आजार असतात, त्यासाठी मनोविकारतज्ज्ञ असतात या माहितीची वानवा, तेथे ग्रामीण भागातील एक बाप मुलाचे शिक्षणात लक्ष लागावे यासाठी मनोविकारतज्ज्ञाची (त्याच्या भाषेत 'डोस्क्याच्या डॉक्टरची) मदत घेऊ इच्छितो, ही माझ्या मनाला उभारी देणारी गोष्ट. मात्र ऐंशीच्या दशकापर्यंत मानसिक आजारांबद्दल सर्वसामान्य लोकांसह वैद्यकीय क्षेत्रात देखील फारशी माहिती नव्हती. औषधे सीमित उपयोगाची होती. त्यांचे दुष्परिणाम त्रासदायक होते. शॉक ट्रिटमेंट हे उपचाराचे प्रमुख आयुध होते, त्याची उपयुक्तता असूनही गैरसमज अधिक होते. एमबीबीएसच्या वैद्यकीय अभ्यासक्रमात मनोविकारशास्त्राला कवडीचे महत्त्व नव्हते. तसे ते आजही नाही. त्यामुळे सर्वसाधारण डॉक्टरांना मनोविकारांची ओळख ही सामान्य माणसाइतकीच वरवर, हे वास्तव.जागतिक आरोग्य संघटनेने १९७३ पासून मानसिक आरोग्याची दखल घेणे सुरू केले. त्याआधी वेड्यांची इस्पितळे आणि त्यातील मनोरुग्णांची स्थिती याविषयी तुरळक चर्चा होत असे. ही प्रादेशिक मनोरुग्णालये म्हणजे ठार वेड्यांचे गोदाम, अशी सर्वसामान्य लोकांची कल्पना, त्यांची आधारापेक्षा दहशत अधिक. जिल्हा रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालये हे गरिबांचे आशास्थान, मात्र महाराष्ट्रात पुणे आणि मुंबई वगळता इतर ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालयात मनोरुग्णांसाठी बाह्यरुग्णविभाग नव्हते, विद्यार्थ्यांसाठी पदव्युत्तर अभ्यासक्रम नव्हते. मुंबईत या अभ्यासक्रमाच्या जागा रिकाम्या जात, सहसा विद्यार्थी मनोविकारतज्ज्ञ होण्यास तयार नव्हते! मनोविकारांविषयी हे अज्ञान आणि उदासीनता वैद्यकीय महाविद्यालयातील शिक्षकांमध्येही असावी? २०१५ सालची गोष्ट. मनोविकारशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या एका होतकरू विद्यार्थ्याला महाविद्यालयाच्या अधिष्ठाता बाई म्हणाल्या, 'अरे,





तुझ्यासारख्या धडधाकट विद्यार्थ्याने शल्यक्रिया, अस्थिव्यंगशास्त्रात शिक्षण घ्यायचे, हे वेड्यांचा डॉक्टर होण्याचे खूळ तुझ्या डोक्यात कसे आले?' ही मनोविकारांविषयी खास भारतीय मानसिकता, मग ती व्यक्ती उच्चविद्याविभूषित का असेना. शैक्षणिक संस्था समाजाच्या मुलभूत गरजांपासून तुटलेली, हे वास्तव.मात्र जागतिक आरोग्य संघटनेने हे वास्तव ओळखले आणि १९९० साली मानसिक आजार आणि व्यसनाधीनता याबद्दल सर्व देशांना मानसिक आरोग्यवाढीचे धोरण आखण्यास भाग पाडले. भारतात शासनाच्या धोरणात वैद्यकीय सेवांत मनोविकारांचा अंतर्भाव झाला १९८२ साली. मात्र त्याला वेग आला १९९६ साली, जेव्हा प्रत्येक जिल्हा रुग्णालयात मनोविकारतज्ज्ञाचे स्वतंत्र पद निर्माण करण्यात आले. बाह्यरुग्णविभाग सुरू करण्यात आला. याला कारण मनोविकारांचे भीषण वास्तव. जगात सुमारे एक बिलियन म्हणजे १०० कोटी लोक तीव्र मनोविकाराने ग्रस्त आहेत, असे जागतिक आरोग्य संघटनेची आकडेवारी सांगते. त्यातले १४ कोटी रुग्ण तर भारतातले. दरवर्षी सुमारे ८ लाख लोक आत्महत्या करतात, त्यातल्या किमान दीड लाख एकट्या भारतात घडून येतात. त्यातही विद्यार्थी आणि तरुण स्त्रियांची संख्या अधिक. या आकडेवारीच्या पार्श्वभूमीवर सगळ्यात भयंकर गोष्ट म्हणजे देशात असलेली मनोविकारतज्ज्ञांची तुटपुंजी संख्या. एक लाख लोकसंख्येमागे किमान पाच मनोविकारतज्ज्ञ असावेत, हे जागतिक आरोग्य संघटनेचे मानक, तसे युरोपमध्ये लाखामागे सहा तज्ज्ञ आहेत. भारताची स्थिती काय? देशातल्या एकूण मनोविकारतज्ज्ञांची संख्या आहे फक्त नऊ हजार. दर लाख लोकसंख्येसाठी केवळ ०.७५ मनोविकारतज्ज्ञ! समुपदेशक, विशेष प्रशिक्षित परिचारिका तर नसल्यात जमा.दरवर्षी महाविद्यालयातून पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या तज्ज्ञांची संख्या इतकी कमी, की जागतिक मानक साध्य करण्यासाठी किमान ७५ वर्षे लागतील!या सगळ्या परिस्थितीत मनोरुग्णांची व्याप्ती काय सांगते? जागतिकीकरण, आर्थिक सुस्थिती आणि शहरीकरण हे तीन घटक भारतीय तंत्रज्ञांच्या प्रगतीचे मानकरी, तेच मनोविकारांची एक प्रचंड लाट आणण्यास कारणीभूत ठरलेले घटक. १९९०च्या दशकापासून भारतीय समाज एका अभूतपूर्व स्थित्यंतरातून जायला सुरवात झाली. ग्रामीण भागातील ३० टक्के लोक शहरात स्थलांतर करून राहू लागले. रोजगाराच्या संधी, आधुनिक राहणीचे आकर्षण, शेतीचे बिघडते अर्थशास्त्र अशी अनेक कारणे. याचा थेट परिणाम कुटुंबव्यवस्थेवर होणे अपरिहार्य होते. पूर्वी कधीतरी असलेली विस्तारित कुटुंबे केव्हाच लयाला गेलेली, त्यानंतर आली एकत्रित कुटुंबे. तोवर सारं ठीकच होतं. मात्र जागतिकीकरणाने एकत्रित कुटुंबे आक्रसली, नव्या नोकरी-व्यवसायाच्या रुंदावलेल्या क्षितिजावर स्वार होऊन नवीन पिढी सातासमुद्रापलीकडे जाऊन पोचली. आता कुटुंबे केंद्रीय (न्युक्लिअर) झाली. २०२० नंतर लग्नसंस्था एका संक्रमणाच्या लाटेत सापडली. नवी पिढी नवे प्रयोग करती झाली. मग एकल पालक कुटुंबे आली.या सगळ्याचा मानसिक विकारांशी काय संबंध? तर कुटुंबातील मानसिक समस्याग्रस्त सदस्याला पूरक, आश्वासक, आधारभूत असणारी कौटुंबिक नाती दुरावली. एकेकाळी अपयश, आपत्ती, आजारपण आणि नैराश्य ओढवलेल्या पोराला आई-वडिलांच्या व्यतिरिक्त आजी-आजोबा, काका-मामा, चुलत भाऊ-बहिणी यांचे पाठबळ असायचे. अननुभवी सुनेचे सुख-दुःख वाटून घेणाऱ्या सासुरवाशिणी वाटेकरी असायच्या. व्यसनाधीनतेच्या वाटेवर निघालेल्या पुरुषाला अटकाव करणारे ज्येष्ठ आप्त होते, त्यांच्या शब्दाला मान होता. मानसिक समस्या कमी होत्या, कारण जीवनाकडून अपेक्षा कमी होत्या. स्पर्धा जीवघेणी झाली नव्हती, महत्त्वाकांक्षा राक्षसी झाल्या नव्हत्या!

मानसिक समस्यांतील वाढ हे समाज सुखवस्तू झाल्याचे लक्षण! कारण ज्या समस्या पूर्वी 'पैसे मोजून' सोडवण्याच्या लायकीच्या वाटत नव्हत्या, त्यांच्यासाठी पैसा उपलब्ध झाला आहे. त्या समस्यांचे महत्त्व पटू लागले आहे. 'कशाचं आलं डिप्रेशन, नसते चोचले मनाचे' इथपासून 'मी कौन्सिलरकडे जाते आहे, थोडे सायकॉलॉजिकल इश्यूज आहेत' इथपर्यंत प्रवास झाला आहे. आता मानसिक ताण ही महानगरांची मक्तेदारी राहिली नाही, तर शहरी आणि निमशहरी नागरिकांना तणाव निर्मित समस्या भेडसावू लागल्या आहेत. जगाचे खऱ्या अर्थाने खेडवळीकरण (ग्लोबल व्हिलेज) झाल्याची कृपा!मानसिक समस्यांत वाढ होण्याचे अजून एक महत्त्वाचे कारण आहे. १९७० साली मार्टिन सेलिग्मन या मनोविकारतज्ज्ञाने असे मत मांडले की तीव्र स्वरूपाच्या मनोविकारांचे उपचार करणे हे जरुरी आहेच, मात्र सर्वसामान्य लोकांना आपल्या जीवनात ज्या समस्या भेडसावतात आणि एक आनंदी जीवन जगण्यापासून रोखतात. त्यांचे निराकरण ही मनोविकारशास्त्राची एक मोठी, ऐतिहासिक जबादारी आहे. जीवनात पैशाने उपभोगाच्या वस्तू मिळतील, आनंद मिळेलच असे नाही. आज ज्या मानसिक समस्यांची वाढ होताना दिसते ती निव्वळ पैशाला प्रगती समजणाऱ्या पिढीचा भ्रमनिरास झाल्याची लक्षणे असू शकतात.

एक महत्त्वाचे निरीक्षण असे की जिल्हा रुग्णालयात स्मरणशक्तीचा क्षय झाल्याच्या लक्षणांत ज्येष्ठ लोकांमध्ये होणारी प्रचंड वाढ. मेंदू-क्षय (डिमेंशिया) हा नव्या युगाचा आजार. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे माणसाचे वाढलेले आयुर्मान! माणसे पूर्वी कधी नव्हती तेवढी जगू लागली आहेत हे कटू सत्य. १९४७ साली आपले आयुर्मान होते फक्त ३२ वर्षे, ते ५० व्हायला १९७० उजाडावे लागले.

खरंच मानसिक समस्यांचा विस्फोट झालाय का?हा विस्फोट नाही, तर आधीही असलेल्या समस्यांची नव्याने झालेली जाणीव, हे खरं उत्तर. समस्या आधीही होत्या, पण त्यांची दखल घेतली जात नव्हती. किंबहुना, त्या समस्या आहेत आणि त्यांना उत्तरे आहेत, याची जाणीवही नव्हती. तणावांचे काही घटक नव्या जीवनशैलीने उदयाला आलेत हे खरं, पण माणसाची मूलभूत समस्या एकच, जगण्याच्या धडपडीत मानसिक संतुलन टिकवून ठेवण्याची. जीवनाचा आनंद घेण्याची. आयुष्य सुसह्य करण्याची.

अक्ल हर चीज को एक जुर्म बना देती है
बेसबब सोचना, बेसूध पशेमां होना...

प्रगती म्हणजे काय? जुनी दुःखे जाऊन नवी दुःखे येणे! जगण्याची मूलभूत धडपड संपून, माणूस अधिक विचार करायला लागला आहे, मानसिक समस्यांची वाढती व्याप्ती हे त्याचेच द्योतक समजायला हरकत माही!

# गुरू नानक देव: मानवता आणि सामाजिक समतेचे प्रवर्तक

भारतीय संत परंपरेत अनेक थोर पुरुषांनी समाजाच्या उद्धारासाठी कार्य केले, पण त्या परंपरेतील सर्वात तेजस्वी आणि मानवतेचा खरा दीपस्तंभ म्हणजे गुरू नानक देव होते. त्यांनी धर्माला पंथ, जाती, विधी यांच्यापलीकडे नेऊन तो समाजकल्याणाशी जोडला. त्यांच्या विचारसरणीत माणुसकी, समानता, सेवा, प्रेम, श्रमसन्मान आणि न्याय यांचे अद्भुत मिश्रण आहे. त्यांचे जीवन हे केवळ धार्मिक क्रांतीचे नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचे घोषणापत्र ठरले. आजच्या काळातही त्यांची शिकवण समाजाला नवा नैतिक मार्ग दाखवते. गुरू नानक देव यांचा जन्म तळवंडी या गावात झाला, ज्याला आज ननकाना साहिब (पाकिस्तान) म्हणून ओळखले जाते. त्या काळात भारतीय समाज धर्माच्या नावाखाली विभागला गेला होता. जातिभेद, अंधश्रद्धा, स्त्रीदमन, शोषण आणि असमानता यांचे सावट संपूर्ण समाजावर पसरलेले होते. धर्म हा व्यवहाराच्या केंद्रस्थानी होता, पण त्याचा वापर लोकशोषणासाठी होत होता. अशा वेळी एका बालकाने समाजाला सांगितले की 'ना को हिंदू, ना को मुसलमान' म्हणजेच प्रत्येक मनुष्य सर्वप्रथम एक मानव आहे. हे वचन त्या काळातील धार्मिक संकुचिततेवर प्रहार करणारे आणि समाजाला नव्या दिशेने नेणारे होते.गुरू नानक देव यांचे बालपण शांत, करुणामय आणि चिंतनशील वातावरणात गेले. लहानपणापासूनच त्यांना सामाजिक अन्याय, गरिबी, आणि धर्माच्या नावाखाली होणारे अत्याचार जाणवले. त्यांनी देवाला शोधण्याची प्रक्रिया बाह्य पूजापद्धतीत नव्हे, तर अंत:करणातील शुद्धतेत शोधली. त्यांनी धर्माला मनुष्याच्या आचरणाशी जोडले. त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे सत्याचा शोध, इतरांविषयी करुणा, प्रामाणिक श्रम आणि सामूहिक कल्याणासाठीची सेवा होय. त्यांची मूलभूत शिकवण तीन शब्दांत सांगता येते ते म्हणजेच 'नाम जपो, किरत करो आणि वंड छको'. या तत्त्वांमध्ये समाजजीवनाची संपूर्ण दिशा अंतर्भूत आहे. नाम जपो म्हणजे सतत सत्य आणि परमात्म्याचे स्मरण, म्हणजेच अंत:करणातील शुद्धता; किरत करो म्हणजे प्रामाणिक श्रम करा, म्हणजेच जीवनात परिश्रम आणि स्वावलंबनाचा सन्मान करा; तर वंड छको म्हणजे आपल्या उत्पन्नातील काही भाग इतरांसोबत वाटून घ्या, म्हणजेच समाजातील दुर्बल घटकांविषयी जबाबदारी बाळगा. या शिकवणुकीत आर्थिक समता, सामाजिक न्याय आणि नैतिकतेचा सुंदर संगम दिसतो. हे तीन तत्त्व आजच्या समाजातही तितकेच उपयुक्त आहेत.

गुरू नानक देव यांनी समाजातील जातिभेदाचा तीव्र निषेध केला. त्यांच्या काळात समाजात 'उच्च' आणि 'नीच' यांच्यातील दरी फारच खोल होती. अस्पृश्यतेने माणसामाणसात भिंती उभ्या केल्या होत्या. पण त्यांनी शिकवले की 'सब मे जोत, जोत है सोई; तिस का चानण सब मे होई.' म्हणजे प्रत्येक जीवामध्ये त्या एकाच देवाची ज्योत आहे. त्यामुळे कोणताही भेदभाव चुकीचा आहे. ही विचारसरणी सामाजिक समतेचे मूलतत्त्व ठरली. त्यांनी देवाच्या कृपेचे दरवाजे सर्वांसाठी खुले केले. त्यांच्या दृष्टीने प्रत्येक मनुष्य प्राणी मग तो कुणीही असो परमेश्वराचा अंश आहे. त्यांच्या कार्यातील सर्वात प्रभावी आणि क्रांतिकारी कल्पना म्हणजे 'लंगर' होय. सामूहिक भोजनाची परंपरा, लंगरात सर्व धर्म, जाती, स्त्री-पुरुष एकत्र बसून एकसमान पद्धतीने जेवतात. लंगर हे केवळ अन्नदान नाही, तर सामाजिक समतेचे सशक्त प्रतीक आहे. या उपक्रमातून त्यांनी उच्चनीचतेची भिंत पाडली आणि सामाजिक ऐक्य निर्माण केले. आजही जगभरातील गुरुद्वारांमध्ये चालणारा लंगर हा मानवतेचा, सेवाभावाचा आणि समतेचा जिवंत वारसा आहे.



गुरू नानक देव यांनी धर्माच्या नावाखाली होणाऱ्या ढोंगीपणाला व पाखंडाला आव्हान दिले. त्या काळातील धार्मिक नेते लोकांना देवाची भीती दाखवून त्यांच्या श्रमावर जगत होते. त्यांनी स्पष्ट सांगितले की, देवाला प्रसन्न करण्यासाठी दान, यज्ञ, हवन, आडंबराची आवश्यकता नाही; खरा धर्म म्हणजे प्रामाणिक आचरण, करुणा, आणि सत्याशी निष्ठा होय. त्यांनी धर्माचा अर्थ पुन्हा परिभाषित केला. 'धर्म हा माणसाला माणसाशी जोडणारा बंध आहे, विभाजक नव्हे.' त्यांनी धर्माला सामाजिक नैतिकतेचा पाया बनवला. गुरू नानक देव हे स्त्रीसमानतेचेही प्रवर्तक होते. त्या काळात स्त्रियांना समाजात कनिष्ठ स्थान होते. पण त्यांनी ठामपणे सांगितले की 'सो क्यों मंदा आखिए, जित जमे राजान.' म्हणजे जी स्त्री राजांना जन्म देते, ती कशी कनिष्ठ असू शकते? त्यांनी स्त्रियांना समाजातील समान स्थान देण्याची आवश्यकता अधोरेखित केली. त्यांच्या विचारांमुळे पुढे शीख धर्मात स्त्रियांना धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मान्यता मिळाली. हे त्या काळातील समाजासाठी अत्यंत प्रगतिशील विचार होते. त्यांनी 'सेवा' या तत्त्वावर आधारलेली एक संस्कृती निर्माण केली. त्यांच्या मते, 'ईश्वराची सेवा म्हणजे मनुष्य प्राण्याची सेवा होय. त्यांनी गरीब, वंचित, पीडित यांच्यासाठी कार्य करणे हेच धर्माचे खरे सार मानले. त्यांनी सांगितले की, समाजातील दुःख कमी करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या सामर्थ्याने योगदान दिले पाहिजे. या सेवाभावातूनच शीख धर्मातील 'सेवा' आणि 'संगत' या दोन संकल्पना निर्माण झाल्या. संगत म्हणजे सामूहिक प्रार्थना आणि सहजीवनाचा भाव, तर सेवा म्हणजे निःस्वार्थपणे कार्य करणे. या दोन्ही कल्पनांनी समाजात बंधुभाव आणि सहकार्याचे वातावरण निर्माण केले.

गुरू नानक देव यांनी समाजात श्रमाचा सन्मान वाढवला. त्यांनी सांगितले की 'घाळ खाए किछ हातहु दे, नानक राहु पछाणे से.' म्हणजे जो स्वतः परिश्रम करतो आणि इतरांना देतो, तोच योग्य मार्ग ओळखतो. त्या काळात श्रम करणाऱ्यांना समाजात नीच मानले जात होते, पण त्यांनी सांगितले की श्रम म्हणजेच साधना. या विचारांनी श्रमिक वर्गाला आत्मसन्मान आणि सामाजिक प्रतिष्ठा दिली. त्यांनी समाजाला शिकवले की परिश्रमाशिवाय अध्यात्म शक्य नाही. गुरू नानक देव यांनी आपल्या जीवनात चार प्रमुख प्रवास केले. भारताच्या विविध भागांपासून ते अरब, तिबेट, श्रीलंका, चीनपर्यंत. या प्रवासांमध्ये त्यांनी विविध धर्म, पंथ आणि संस्कृतींच्या लोकांशी संवाद साधला. त्यांनी सर्व धर्मांच्या श्रेष्ठ तत्त्वांना मान्यता दिली आणि सर्वांमध्ये एकतेचा संदेश दिला. त्यांनी सांगितले की सत्य आणि प्रेम हाच प्रत्येक धर्माचा मूळ गाभा आहे. त्यामुळे त्यांच्या विचारांमध्ये सर्वधर्मसमभावाचे अधिष्ठान आहे. त्यांचे तत्त्वज्ञान समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर, ते 'समावेशक समाजरचना' निर्माण करण्याचा आराखडा होते. त्यांनी सांगितले की समाज हे धर्म, जात, लिंग या आधारांवर नव्हे, तर समानता, सहकार्य, आणि न्याय या मूल्यांवर उभे राहिले पाहिजे. त्यांनी व्यक्तीच्या आणि समाजाच्या नैतिक जबाबदाऱ्या अधोरेखित केल्या. त्यांनी धर्म आणि समाज यांचा मेळ घालून एक सामाजिक चळवळ निर्माण केली. त्यांच्या शिकवणीत आर्थिक न्याय या संकल्पनेलाही महत्त्व आहे. त्यांनी श्रीमंत-गरीब यांच्यातील विषमता नाकारली आणि 'वंड छको' या तत्त्वाद्वारे संपत्तीचे समान वाटप करण्याचा संदेश दिला. त्यांनी लोभ, स्वार्थ आणि शोषणाला पाप ठरवले. त्यांच्या विचारांमध्ये सामूहिक समृद्धीची कल्पना आहे. आजच्या काळातील 'सामाजिक समता' आणि 'आर्थिक न्याय' या संकल्पना त्यांच्या शिकवणीशी पूर्णपणे सुसंगत दिसतात.गुरू नानक देव यांची समाजदृष्टी सर्वसमावेशक, वैज्ञानिक आणि आधुनिक होती. त्यांनी शिक्षण, आत्मविकास, सत्यशोधन आणि सामाजिक जबाबदारी यांचा परस्परसंबंध स्पष्ट केला. त्यांच्या विचारांमध्ये पर्यावरणीय समतोलाचाही गाभा आहे. त्यांनी सांगितले की, 'हवा गुरू, पाणी पिता, माता धरत महत.' म्हणजे निसर्गातील प्रत्येक घटक आपला नातेवाईक आहे. त्यामुळे निसर्गाचा सन्मान करणे हेही धर्माचेच रूप आहे. आजच्या युगात, जेव्हा समाजात असहिष्णुता, भेदभाव, धार्मिक दुरावा आणि नैतिक अध:पतन वाढले आहे, तेव्हा गुरू नानक देव यांचे तत्त्वज्ञान अधिकच अर्थपूर्ण वाटते. त्यांनी दाखवलेला मार्ग केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक पुनर्जागरणाचा आहे. त्यांनी माणसामाणसात प्रेम आणि सहकार्याची भावना निर्माण केली. त्यांनी सांगितले की समाजाचा खरा विकास तेव्हाच शक्य आहे, जेव्हा प्रत्येक व्यक्ती इतरांसाठी जगते आणि इतरांच्या हितासाठी कार्य करते. गुरू नानक देव जयंती म्हणजे केवळ धार्मिक सण नाही, तर मानवतेच्या पुनरुज्जीवनाचा दिवस आहे. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की, धर्माचा सार माणसाच्या कल्याणात आहे, विधी-विधानात नव्हे. त्यांनी दिलेले 'नाम, किरत, वंड' हे त्रिसूत्र आजही समाजजीवनाचे दिशा-तत्त्व ठरू शकते. त्यांनी शिकवले की समाजात एकमेकांविषयी आदर, प्रेम, समानता आणि करुणा हीच खरी ईश्वरभक्ती आहे.शेवटी असे म्हणता येईल की गुरू नानक देव हे केवळ शीख धर्माचे प्रवर्तक नव्हते, तर ते मानवतेचे जागतिक प्रवक्ते होते. त्यांनी दाखवलेला मार्ग कालातीत आहे, जो प्रत्येक माणसाला स्वतःच्या अंत:करणाशी जोडतो आणि समाजाशी नाते घट्ट करतो. त्यांचे विचार आजही समाजाच्या आत्म्याला नवी ऊर्जा देतात. त्यांच्या शिकवणुकीचा अर्थ असा की, माणूस हेच देवाचे सर्वश्रेष्ठ रूप आहे. म्हणूनच गुरू नानक देव जयंती साजरी करणे म्हणजे त्यांच्या तत्त्वांचा अंगीकार करून समाजात प्रेम, समानता आणि सेवा या मूल्यांचा पुनःप्रकाश प्रज्वलित करणे होय.

# अतिवृष्टीने बाधित गावातील नुकसानीची केंद्रीय पथकाकडून पाहणी

## ग्रामस्थांशी संवाद साधून नुकसानीचा घेतला सविस्तर आढावा

दैनिक वादळ वार्ता

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती, घरे, रस्ते, पूल, वीज व पाणीपुरवठा तसेच सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या उच्चस्तरीय केंद्रीय पथकाने आज दि. ५ नोव्हेंबर रोजी पाथर्डी तालुक्यातील विविध गावांना भेट देऊन नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली.या पथकाचे नेतृत्व भारत सरकारच्या सहसचिव आर. के. पांडे यांनी केले. त्यांच्यासोबत कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संचालक डॉ. अरविंद वाघमारे, तसेच गृह मंत्रालयाचे आशिष गौर, उपस्थित होते.

पथकासोबत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, तहसीलदार उद्धव नाईक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे व इतर अधिकारी उपस्थित होते.पथकाने पाथर्डी तालुक्यातील करंजी, देवराई, पारेवाडी व सोमठाणे खुर्द या गावांना भेट दिली. करंजी येथे राष्ट्रीय महामार्गावरील नुकसानग्रस्त पुलाची पाहणी करण्यात आली. यावेळी पावसाचे पाणी घरात शिरल्याने नुकसान झालेल्या ग्रामस्थ राजेंद्र पारेकर यांच्याशी पथकाने संवाद साधून परिस्थितीची माहिती घेतली.तसेच शेतकरी बबनराव दानवे यांच्या संत्रा फळबागेची व पावसामुळे खरडून गेलेल्या जमिनीची पाहणी केली. यावेळी पथकाने भविष्यात अशा आपत्तीजनक परिस्थिती उद्भवू नयेत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.यानंतर पथकाने देवराई येथील बंधारे व पारेवाडी येथील पाण्यामुळे क्षतिग्रस्त झालेल्या पुलाचीही पाहणी केली. जिल्ह्यातील नुकसानग्रस्त पुलांची व बंधाऱ्यांची सविस्तर माहिती घेत पथकाने आवश्यक त्या ठिकाणी पुनर्बांधणी करण्याच्या सूचना दिल्या.तसेच सोमठाणे खुर्द येथील शेतकरी मोहन शिदोरे यांच्या शेतातील तूर व बाजरी पिकांचे झालेले नुकसान प्रत्यक्ष पाहून पथकाने संबंधित अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना दिलेल्या तातडीच्या मदतीची माहितीही जाणून घेतली.केंद्रीय पथकाने संपूर्ण पाहणीदरम्यान ग्रामस्थांशी संवाद साधत नुकसानग्रस्तांना दिलासा देत त्यांच्या नुकसानीची माहिती जाणून घेतली.



## रिपाइं आ ची उदगीर न. प. निवडणुकी संदर्भात बैठक संपन्न



दैनिक वादळ वार्ता

**उदगीर । प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) तालुका उदगीर च्या वतीने दिनांक ५/११/२०२५ रोजी उदगीर येथील पक्ष कार्यालयात बैठक घेण्यात आली, नगर पालिका उदगीर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी मराठवाडा सरचिटणीस देविदासजी कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) तालुका उदगीर च्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ताकतीने लढवण्या संदर्भात व विविध विषयावर चर्चा करण्यात आली, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यां सोबत चर्चा आली. व उदगीर शहरांमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ची ताकद वाढलेली असून त्या प्रमाणामध्ये महायुतीतून जागा सोडवून घेण्यात याव्यात, व महायुतीने रिपब्लिकन पक्षाला सोबत घेण्यास टाळा केल्यास इतर समविचारी पक्षासोबत युती करून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लढविण्याचा ठराव घेण्यात आला. तसेच उदगीर नगर परिषदेतील आठ ही राखीव जागा रिपब्लिकन पक्षाला देण्यात याव्यात, असाही ठराव यावेळी घेण्यात आला. या बैठकीला मार्गदर्शक म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे मराठवाडा सरचिटणीस देविदास कांबळे उपस्थित होते, यावेळी उदगीर तालुकाध्यक्ष ड. प्रफुल्लकुमार उदगीरकर, युवक जिल्हाध्यक्ष सुशीलकुमार शिंदे, तालुका प्रवक्ते अतुल घोडके, कामगार आघाडीचे अध्यक्ष मनोज माणसे, तालुका सचिव हुसेन शेख, तालुका उपाध्यक्ष रावसाहेब भालेराव, शहर अध्यक्ष सुधीर घोरपडे, नितीन गायकवाड, नरेश चांदे ,रईस शेख, मकबूल शेख, शंकर वाघमारे, गुंडू शिंदे,राजकुमार उदगीरकर ,भीमा वाघमारे, प्रवीण सूर्यवंशी, शशिकांत तलवारे व इतर पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

## मानवता हाच खरा धर्म–महेंद्रशेठ घरत

# महेंद्रशेठ घरत यांच्यातर्फे टी–शर्ट देणगी स्वरूपात

दैनिक वादळ वार्ता

**उरण । प्रतिनिधी**

महान संत साईबाबांनी आपल्याला श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र दिला. याच साईबाबांची पालखी श्री साई सेवा मंडळ उरण काढते. त्यांचे यंदा पालखीचे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे, ही गौरवास्पद बाब आहे. त्यांचा आदर्श घेऊन उरण परिसरात शिर्डीला पालखी निघण्याची परंपरा सुरू झाली आहे. भर उन्हातून तरुण पायी शिर्डीला जातात, त्यांना सहकार्य करणे मी माझे कर्तव्य मानतो. मानवता हाच खरा धर्म आहे, असे मी मानतो आणि कृतीतून ते समाजात दाखवून देतो, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी सोनारी येथे आपले मत व्यक्त केले.



आई–वडिलांची सेवा करा, त्यांची सेवा केलीत तर आयुष्यात काहीही कमी पडणार नाही, मी सेवेचे व्रत हाती घेतले आणि सुखकर्ता बंगल्यावरून ते चोवीस तास चालते. वेगवेगळ्या सेवेचा यात समावेश आहे. त्यात खंड पडू देत नाही, असेही महेंद्रशेठ घरत यावेळी म्हणाले.

महेंद्रशेठ घरत यांच्यातर्फे शिर्डीला जाणाऱ्या तरुणांना टी–शर्ट देण्यात आले, गेल्या तीन वर्षांपासून टी–शर्ट देण्याचा उपक्रम महेंद्रशेठ घरत यांनी सुरू केला आहे.यावेळी काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, अल्पसंख्याक विभाग अध्यक्ष अखलाख शिलोत्री, द्रोणागिरी स्पोर्ट असोसिएशनचे महादेव घरत, उद्योजक मंगेश तांडेल, माजी जिल्हा परिषद सदस्य तुकाराम कडू, मुरलीधर ठाकूर, लंकेश ठाकूर, भेंडखल उपसरपंच अजित ठाकूर, उरण तालुका युवक इंटक अध्यक्ष राजेंद्र भगत, उरण तालुका पर्यावरण अध्यक्ष अंगद ठाकूर, रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश ठाकूर, ग्राम सुधारणा मंडळ सोनारी उपाध्यक्ष प्रशांत कडू आणि मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. यावेळी अपोलो हास्पिटल, ग्रामसुधारणा मंडळ अध्यक्ष आणि ग्रामपंचायत सोनारीच्या वतीने आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. टोपी आणि ओळखपत्र वाटपही यावेळी करण्यात आले.

## क्रीडांगण निधीचा गैरवापर थांबवावा–मा.नगराध्यक्ष आयुब हबीब शेख राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्षचा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता

**लोहारा । प्रतिनिधी**

लोहारा नगरपंचायतसाठी शासनाकडून क्रीडांगण व खेळाच्या साहित्याकरिता जवळपास एक कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. मात्र, नगराध्यक्ष वैशाली अभिमान खराडे या आपल्या अधिकाराचा गैरवापर करून सदर निधी इतर कामांकडे वर्ग करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.






या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी उपनगराध्यक्ष व शहराध्यक्ष आयुब हबीब शेख यांनी जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पुजार, जिल्हा नगर प्रशासन अधिकारी तसेच जिल्हा नियोजन समिती अधिकारी यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, लोहारा हे तालुक्याचे ठिकाण असून सुमारे २५ ते ३० हजार लोकसंख्या असलेले शहर आहे. येथे दोन महाविद्यालये, अनेक माध्यमिक शाळा तसेच जिल्हा परिषद केंद्रीय शाळा असून मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शहरातील नागरिक, विद्यार्थी आणि युवकांना व्यायाम व क्रीडा क्रियाकलापांसाठी योग्य व सुरक्षित जागा उपलब्ध नसल्याने क्रीडांगणाची तीव्र गरज आहे.

शासनाकडून प्राप्त निधीचा उपयोग क्रीडांगण व खेळाचे साहित्य खरेदीसाठी होणे अपेक्षित असतानाही, नगराध्यक्ष यांनी हा निधी मर्जीतील लोकांच्या कामाकरिता वापरण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या संदर्भात प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव नगराध्यक्षांच्या कार्यालयातून पाठविण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

निधीचा गैरवापर होऊ नये म्हणून हा प्रस्ताव तात्काळ थांबवावा तसेच निधीचा उपयोग लोहारा नगरपंचायत हद्दीतील उपलब्ध ओपन स्पेसवर क्रीडांगण उभारण्यासाठीच करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच, गुणवत्तापूर्ण काम होण्यासाठी मुख्याधिकारी, नगरपंचायत लोहारा यांना योग्य त्या सूचना देण्यात याव्यात, अशी विनंती करण्यात आली आहे.

## माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते मनोहर पाटील शिंदे यांच्या जन संपर्क कार्यालयाचा उद्घाटन सोहळा संपन्न



दैनिक वादळ वार्ता

**नांदेड । प्रतिनिधी**

याबाबत सविस्तर बातमी अशी की, माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे धनेगावकर यांच्या जनसंपर्क कार्यालयाचा उद्घाटन सोहळा माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी धनेगाव परिसरातील पंकज नगर या ठिकाणी उत्साहामध्ये संपन्न झाला. आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने या संपर्क कार्यालयाची महत्त्वाची भूमिका असणार आहे, मनोहर पाटील शिंदे यांना यावेळी उपस्थित मंडळींनी शुभेच्छा दिल्या. या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी राजकीय नेते मंडळी, पदाधिकारी कार्यकर्ते तसेच असंख्य मंडळींची यावेळी उपस्थिती होती.

# राहुल गांधींनी उघड केलेला मतचोरीचा हरियाणा पॅटर्न महाराष्ट्रातही,निवडणुका हा केवळ सोपस्कार: हर्षवर्धन सपकाळ

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष निवडणूक आयोगाच्या मदतीने मतचोरी करून सरकारच चोरत आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज पुन्हा एक बॉम्ब टाकून भाजपा व निवडणूक आयोग लोकशाहीचा खून कसा करत आहेत हे देशाला दाखवून दिले. हरियाणात मतचोरी कशी केली याचे एक एक पुरावे देऊन निवडणूक आयोगाला नागडे केले पण निर्लज्जम सदा सुखी या उक्तीप्रमाणे निवडणूक आयोगाच्या कामात काहीच सुधारणा होत नाही. निवडणूक आयोग हा सरकारच्या हातातली कठपुतली बाहुली बनले आहे, असा घणाघाती हल्ला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.यासंदर्भात वर्धा सेवाग्राम येथे प्रतिक्रिया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, राहुल गांधी यांनी आज देशासमोर पुराव्यासह ठेवल्यानंतरही निवडणूक आयोग जागा होत नाही. याचा अर्थ स्पष्ट आहे की झोपी गेलेल्याला जागे करणे सोपे आहे पण झोपेचे सोंग घेत असलेल्याला जागे करणे अवघड आहे. निवडणूक आयोग पुरावे मागत होते ते पुरावेही राहुल गांधी यांनी दिले. आम्ही त्यांना सांगतोय की सूर्य पूर्वेकडून उगतोय तर ते म्हणतात की पश्चिम कडून का उगवत नाहीय याचे उत्तर द्या. निवडणूक आयोग हा सरकारच्या दबावाखाली काम करत आहे, मतदार यादीमध्ये तांत्रिक घोटाळा मोठ्या प्रमाणात केला आहे. मतदार यादी नोंदण्याची आणि मतदार यादीमध्ये नाव इतरत्र वळविण्याच्या अनुषंगाने एकत्रित स्वरूपाची गुन्हेगारी सुरू असून निवडणूक आयोग मात्र हातावर हात देऊन बसला आहे.हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, लोकशाहीमध्ये निवडणुका या निष्पक्ष व पारदर्शक पद्धतीने घेण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे. पण आयोगच सरकारच्या ताटाखालचे मांजर बनून काम करत असेल तर ते लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे आणि तेच आज देशभरात होत आहे. हरियाणात २५ लाख मतांचा घोटाळा उघड झाला आहे. एकच व्यक्तीचे नाव विविध नावाने २२ वेळा मतदार यादीत असणे, एका ब्राझिलियन मॉडेलचे नाव २२ वेळा मतदार



यादीत असणे, अनेक वेगवेगळ्या बुथवर एकाच व्यक्तीचे नाव असणे अशा अनेक पद्धतीने मतदार याद्यांमध्ये गडबड करण्यात आली. महाराष्ट्रातही विधानसभेला तोच हरियाणा पॅटर्न वापरून भाजपाने चोरीचे सरकार बनवले. महाराष्ट्रात अवघ्या सहा महिन्यात ४७ लाख मतदार वाढले तर मतदानानंतर रात्रीच्या अंधारात जवळपास ८ टक्के मतदान वाढल्याचे दाखवले. आता त्याच सदोष मतदार याद्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी वापरल्या जात आहेत. विरोधी पक्षांनी त्या याद्या दुरुस्त करण्याची मागणी केली असता त्याकडे दुर्लक्ष करुन निवडणुका जाहीर केल्या हे सर्व भाजपाला अनुकुल आहे. मतदार यादीतील दुबार तिबार मतदाराच्या नावापुढे स्टार लावण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रात घेतला आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे की त्यांच्याकडे दुबार, तिबार, दोनशेबार, पाचशे बार एका मतदाराचे नाव यादीत आहे, याचा स्पष्ट डेटा त्यांच्याकडे उपलब्ध आहे. निवडणूक आयोगाकडून अपेक्षा आहे की त्यांनी टू स्टार देऊन दोन नंबरी कारभार करू नये. निवडणूक आयोगाचा जो ४२० चा दस नंबरी कारभार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेत पत्रकारांनी मतदार याद्यांतील घोळाबद्दल प्रश्नांच्या फैरी झाडल्या पण एकाही प्रश्नाचे उत्तर निवडणूक आयोगाला देता आले नाही. अशा भ्रष्ट मार्गाने निवडणुका होत असतील तर त्याचा काय उपयोग? असा प्रश्न काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उपस्थित केला आहे.

# आ.विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नातून गेवराईच्या विकासासाठी ४० कोटी रुपयांचा निधी मंजुर

## शहरात विविध ठिकाणी दहा कोटी रुपयांच्या विकास कामांचा शुभारंभ

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नातून अतिशय अल्प कालावधीत गेवराई शहराच्या सर्वांगिन विकासासाठी ४० कोटी रुपयांचा निधी मंजुर झाला आहे. मंजुर निधीतून अतिशय दर्जेदार कामे होत आहेत, भविष्यात शहराच्या विकासासाठी अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाची आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाची गरज असल्याचे प्रतिपादन माजी नगरसेवक राधेशाम येवले यांनी केले. गेवराई शहरातील दहा कोटी रुपये किंमतीच्या विविध विकास कामांचा शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादीचे युवा नेतृत्व रणवीर पंडित, दत्ता दाभाडे, खालेद कुरेशी, दिनेश घोडके, अक्षय पवार, जयसिंग माने यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.मंगळवार, दि.४ नोव्हेंबर रोजी सकाळी गेवराई शहरात विविध ठिकाणी विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये गेवराई नगर परिषद अंतर्गत तय्यबनगर येथे सिमेंट रस्ता व नाली बांधकाम, भगवान नगर येथे सभामंडप व संरक्षण भिंत बांधकाम, शिवाई नगरी येथे सिमेंट रस्ता व नाली बांधकाम, संजयनगर येथे भिल्ल समाजाची स्मशानभुमी संरक्षण भिंत बांधकाम, विरशैव स्मशानभुमीच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम, बसवेश्वर ४/५ सिमेंट रस्ता व नाली बांधकाम, संजयनगर येथे सिमेंट रस्ता व नाली बांधकाम तसेच मसनजोगी समाजाच्या सामाजिक सभागृहाचे बांधकाम आणि महादेव मंदिर परिसरात सभामंडप बांधकाम, आदर्शनगर येथे सेवा मंडप बांधकाम, अचानक नगर येथे सभामंडप बांधकाम, सावतानगर येथे सभामंडप बांधकाम, विद्यासागर कॉलनी येथे सिमेंट रस्ता व नाली बांधकाम, सरस्वती कॉलनी येथे अभ्यासिकेचे नुतणीकरण, अहिल्यानगर येथे सिमेंट रस्ता बांधकाम, शाहूनगर येथे रस्ता बांधकाम अशा विविध १० कोटी रुपये किंमतीच्या विकास कामांचा समावेश आहे.यावेळी बोलताना रणवीर पंडित म्हणाले




की, आ. विजयसिंह पंडित यांच्या आमदारकीच्या दहा महिन्यांच्या कालावधीमध्ये आपण गेवराई शहरासह मतदार संघामध्ये कोट्यावधी रुपयांची विकास कामे केली आहेत. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली यापुढेही गेवराई शहरामध्ये विकासकामे करण्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. मंजुर झालेली सर्व कामे दर्जेदार करण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. विधानसभा निवडणुकीमध्ये माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी जो शब्द दिला होता तो यानिमित्ताने पूर्ण केला जात आहे. येणाऱ्या काळात गेवराई शहरामध्ये उर्वरित विकास कामे करून कायापालट केला जाईल असेही ते यावेळी म्हणाले.यावेळी अमित वैद्य, सचिन दाभाडे, संदिप मडके, नाना खरात, अनिल मोटे, रविंद्र बोराडे, प्रभाकर भालशंकर, बाळासाहेब दाभाडे, लहूराज लोखंडे, विजय सुतार, नवीद मशायक, शेख मोहसीन, इम्रान अन्सारी, बाबू बेदरे, सय्यद सुभान, निजामभाई, राहूल मस्के, किशोर वादे, वसीम फारुकी, रवि कानडे, शेख बाबा, मोहसीन बागवान, हेमंत दाभाडे, विशाल होनमाने, बबलू सानप यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व विविध प्रभागातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डांबरी मार्गाची दुरवस्था; जंगल भागातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग धोक्याचा,तर काही ठिकाणी दुरुस्तीचे काम ठप

दैनिक वादळ वार्ता
**किनवट । प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग क्र.१६१(ए)आठ वर्षानंतरही जंगल भागातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या सिमेंट काँक्रीट कामाला वन विभागाची एनओसी मागील आठ वर्षांपासून मिळाली नाही. त्यामुळे वन जमिनीच्या ठिकाणी डांबरीकरणाचे काम रखडले असून आदिवासी तालुक्यालाच वनविभाग का वेठीस धरत आहे, असा प्रश्न पडला आहे. महामार्गात काही ठिकाणी डांबररस्त्यात खड्डे तर सिमेंट रस्त्यात भेगेचे जाडे दिसत आहे. चिखली ते गोकुळनगर, राष्ट्रीय महामार्गचे काम गेल्या आठ ते दहा दिवसांपासून दुरुस्तीचे काम अचानक बंद. पडले आहे. या महामार्गाच्या सिमेंट रस्त्यावर भेगा पडल्यामुळे दुरुस्तीचे काम सुरू झाले होते. तेअचानक काम थांबवण्यात आले त्यामुळे वाहनचालकांना



वाहन चालवताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. नांदेड-भोकर- हिमायतनगर-किनवट-माहूर-धनोडा राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ (ए) व इतर महामार्गाचे भूमिपूजन २३ ऑक्टोबर २०१७ रोजी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी श्रीक्षेत्र माहूर येथे भूमिपूजन केले. त्यानंतर सर्वप्रथम कोठारी ते सरसम या महामार्गाच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली. कोठारी ते हिमायतनगर हा महामार्ग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या दुर्लक्षामुळे काम सुरू असताना अनियमितता प्रकर्षाने होती. आजही वाहने चालवताना याचा अनुभव येतो आहे. नंतरच्या काळात कोठारी ते किनवट-माहूर- धनोडा या ५७किलोमीटर या महामार्गाचे कामही धरसोड पद्धतीने केलेले आहे.

अरुंद रस्त्यावरुनच सुरू आहे वाहतूक

हिमायतनगर ते किनवट, सारखणी या महामार्गावर इस्लापूर, रिठा, धानोरा ते सावरी, बोधडी (बू) घाट, आश्रम शाळा, लोणी राजगड (घाट), राजगड, वडोली ते सारखणी घाट या १४ किलोमीटर अंतराचा महामार्ग जंगलातून जात आहे. परंतु अजूनही वन विभागाची मंजुरी मिळाली नाही. परिणामी दीड दोन वर्षापूर्वी अरुंद डांबरीकरणाचे काम हाती घेतले. परंतु, तेही काम जागोजागी उखडल्याने मोठमोठे खड्डे पडल्याने वाहने चालवताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

## रज्जाक बागवान पंचायत समिती निलंगा यांची जिल्हा पालक अध्यक्ष पदी नियुक्ती



दैनिक वादळ वार्ता
**लातूर । प्रतिनिधी**

लातूर जय महाराष्ट्र शासन निर्णय शासकीय कर्मचारी मान्यताप्राप संघटनेची बैठक दिनांक ०२/११/२०२५ रोजी लातूर येथे बैठकीस राज्याचे अध्यक्ष माननीय श्री अशोकजी डहाळे, राज्य सचिव आनंद भिसे व राज्य कार्याध्यक्ष शरद बिरादार व इतर राज्य पदाधिकारी यावेळेस हजर होते यावेळी रज्जाक बागवान यांची जिल्हा पालक अध्यक्ष पदी नियुक्तीपत्र राज्याध्यक्ष यांनी देऊन त्यांचा सत्कार केला या बैठकीत संघटनेची मागणी प्रथम प्राधान्य म्हणून कनिष्ठ लिपिक वरिष्ठ लिपिक एकत्र करणे व या पदास विकास अधिकारी असे नामकरण करणे व चौथ्या वेतन आयोगापासून वेतन त्रुटी दूर करणे तसेच २००५ ची जुनी पेन्शन जशास तसे लागू करणे हे प्रमुख मागण्या होते

## युवासेना पदाधिकाऱ्या आढावा बैठकीस उपस्थित रहा-विपुल पिंगळे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेशजी सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत युवासेनेची एक महत्त्वपूर्ण पदाधिकारी आढावा बैठक आयोजित करण्यात आली असुन हे बैठक दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं ४.०० वा नांदेड,हिंगोली, परभणी या जिल्ह्यांच्या बैठका होणार असून बैठकीचे ठिकाण हे शिवसेना मध्यवर्ती कार्यालय स्वातंत्र्य वीर सावरकर



चौक निराला बाजार छत्रपती संभाजी नगर येथे होणार आहे व सायं ६ वाजता जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या बैठक हि पण शिवसेना मध्यवर्ती कार्यालय स्वातंत्र्य वीर सावरकर चौक निराला बाजार छत्रपती संभाजीनगर येथेच होणार आहे ह्या बैठका दोन दिवसाच्या बैठका असणार आहे दिनाक ८ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजता लातुर बीड व धाराशिव बैठकीचे ठिकाण परिमल मंगल कार्यालय धाराशिव येथे असणार आहे युवासेना मुख्य सचिव राहुलजी लोढे आणि युवासेना सचिव किरणजी साळी यांचीही या बैठकीला विशेष उपस्थिती असेल या बैठकीमध्ये आगामी निवडणुका लक्षात घेऊन संघटना अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार असून युवासेनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन युवा सेना कार्यकारणी सदस्य महाराष्ट्र राज्य तथा संपुर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे यांनी केले आहे.

## सर्पमित्र कृष्णा बेरड पाटील यांचे कौशल्यपूर्ण कार्य दोन अति विषारी घोणस सापांचे निसर्गात मुक्तता

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर शहराच्या नजीकच्या नागरी वस्तीत भीतीचे वातावरण निर्माण करणारे दोन अति विषारी घोणस जातीचे साप आढळून आले. नागरिकांनी तत्काळ सर्पमित्र कृष्णा बेरड पाटील यांना संपर्क साधला. त्यांनी अत्यंत धाडस, कौशल्य आणि शांतपणे कार्य करत दोन्ही सापांना जखमी न करता पकडून सुरक्षितपणे निसर्गात सोडून दिले. या दोन्ही अति विषारी सापांना वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे व वनरक्षक खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली निसर्गात मुक्त करण्यात आले. यावेळी सर्पमित्र कृष्णा बेरड यांच्यासोबत अंकित चव्हाण, ओम जंगम, प्रताप भाऊ भिंगारदिवे, रंगनाथ बेरड, बाला कुमटकर, सुरज लंगोटे, तेजस खामकर, बंटी भाऊ लाहुडे, गाडेकर आदी उपस्थित होते.

नागरी वस्तीत साप दिसताच परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. मात्र सर्पमित्र बेरड यांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून सुरक्षितपणे साप पकडल्यानंतर नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. या प्रसंगी सर्पमित्र कृष्णा बेरड पाटील म्हणाले की, हिवाळ्याचे दिवस सुरू असल्याने घोणस, कोब्रा, अजगर अशा विविध सर्प जातींची हालचाल वाढते. नागरिकांनी साप दिसल्यास घाबरू नये किंवा त्यांना मारू नये. साप हे पर्यावरणातील संतुलन राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. 'साप जगवा, निसर्ग वाचवा' हे आपले ब्रीदवाक्य घेऊन तसेच नागरिकांना आवाहन करताना त्यांनी सांगितले की, जर कुठे साप आढळल्यास त्वरित सर्पमित्र कृष्णा बेरड पाटील यांच्याशी संपर्क ९३७००७५५५५ / ९६६५०७५५५५ आव्हान करण्यात आले.

# खडकी-देऊळगावराजे गटात विरधवल जगदाळेंच आघाडीवर, उमेदवारीसाठी वाढता जोर

## देऊळगावराजे येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आढावा बैठक पार पडली

दैनिक वादळ वार्ता
**दौंड । प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. खडकी-देऊळगावराजे जिल्हा परिषद गटात उमेदवारीसाठी माजी जिल्हा परिषद सदस्य आणि दौंड शुगरचे संचालक विरधवल जगदाळे यांच्या नावाला सर्व स्तरावरून मोठा पाठिंबा मिळत असून याच संदर्भात आज देऊळगावराजे येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आढावा बैठक पार पडली.या बैठकीत बोलताना माजी आमदार रमेश थोरात म्हणाले, खडकी-देऊळगावराजे नव्याने तयार झालेला जिल्हा परिषद गट असून, या भागात सर्व बाजूंनी विरधवल जगदाळे यांना उमेदवारी द्यावी अशी कार्यकर्त्यांची ठाम भूमिका आहे. त्यांनी पूर्वी या भागाचे प्रतिनिधित्व करत असताना केलेल्या विकासकामांमुळे त्यांच्यावर जनतेचा आणि कार्यकर्त्यांचा विश्वास आहे.विरधवल जगदाळे यांच्या नेतृत्वाखालील महत्वाची विकासकामे: ग्रामपंचायत






कार्यालये, व्यायामशाळा, विरंगुळा केंद्र यांची उभारणी पाणी साठवण बंधारे, अंगणवाडी व आरोग्य उपकेंद्र इमारतींची निर्मिती ग्रामीण रस्ते, पानंद मार्ग, बंदिस्त गटारे, पाणी टाक्या यांसारखी पायाभूत सुविधा उपलब्ध दौंड शुगरमार्फत ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी ठोस पावले युवकांना रोजगार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना तसेच त्यांनी अजित पवार यांच्या सहकार्याने या भागात मोठ्या प्रमाणात निधी आणून विकास कामे गतीमान केल्याचेही मान्यवरांनी यावेळी नमूद केले. बैठकीला उपस्थित मान्यवर: माजी आमदार रमेश थोरात महानंदा संस्थेच्या माजी अध्यक्षा वैशालीताई नागवडे माजी जि.प. सदस्य विरधवल जगदाळे,तालुका अध्यक्ष नितीन दोरगे,माजी उपसभापती उत्तम (आप्पा) आटोळे,माजी उपसभापती प्रकाश नवले, मिलिंद मोरे माजी चेअरमन संजय भोसले माजी सरपंच मच्छिंद्र पोटफोडे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077